# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- १) नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१/वि.क्र.११२,दि. ०२.०३.२०२२

**{समाज विकास विभाग}** समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत दिव्यांग बांधवांकरिता वैयक्तिक तथा सामुहिक योजने अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवितांना त्यांच्या अटी व शर्ती निर्गमित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संबंधित सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. तथापि या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान त्या-त्या घटक योजनांकरिता निर्गमित करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये, निकषांमध्ये सुधारणा करणे व निर्वाह भत्त्यासारखी नवीन योजना आवश्यक असल्यामुळे नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१ / वि.क्र.११२, दि.०२.०३.२०२२ अन्वये अटी व शर्तीमध्ये, निकषांमध्ये सुधारणा करण्यात आले असून त्यानुसार दिव्यांग योजनांची अंमलबजावणी सुरु होती. तथापि, सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान मतीमंद घटकातील दिव्यांगांना निर्वाह भत्ता योजनेंतर्गत वयाची अट ६० असल्यामुळे, ६० वर्ष पूर्ण केलेल्या दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित होते.परंतू या आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत एकही दिव्यांग व्यक्ती वयाचे अटीमुळे पात्र न झाल्याने त्यांना योजनेचा लाभ देता आला नाही.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात नागपूर मनपा द्वारे दिव्यागांच्या सुरु असलेल्या योजनाबाबत मा.प्रशाक तथा आयुक्त यांना बैठक दि. ०८.०९.२०२३ रोजी आयोजित करून दिव्यांग विकास आराखड्यास मान्यता प्रदान केली.आराखड्यातील अनु क्र.३ अन्वये ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी यांना लाभ देणे हेतू निकषात बदल करून सुधारित निकषानुसार योजना राबविण्याचे निर्देश दिले होते.त्याअनुषंगाणे पुढीलप्रमाणे सुधारित योजना प्रस्तावित करण्यात येत आहे,

नागपूर शहरी भागात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील लाभार्थ्यांची संख्या ३८९२ आहे.संजय गांधी निराधार योजना तसेच राजमाता जिजाऊ अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेण्याकरिता विभागास अर्ज सादर केल्यावर विभागाचे अटी व शर्तीनुसार पात्र ठरल्यास त्यांना योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. या योजने करिता वयाची अट रद्द करण्यात येत आहे.निर्वाह भत्ता योजनेचे निकष पुढीलप्रमाणे आहे

योजना :- मतिमंद,सेरेबल पालसी,ऑटीझम,विशेष विकलांग,बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांगांना
निर्वाह भत्ता अर्थसहाय्य योजना.

अर्थसहाय्य :- प्रति लाभार्थी दरमहा रु. ५००/-

अर्थसंकल्पीय व्यय पद क्र.व पद शिर्ष विवरण :- A२७३०१३४२३०२ - दिव्यागांकरिता मदत

अटी व शर्ती :-

1. कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान 3 वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
2. आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.
3. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
4. अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील. UDID कार्ड जोडल्याशिवाय योजनेचा लाभ देता येणार नाही.
5. सदर योजनेंतर्गत अनाथ किंवा अर्जदारांचा पालन पोषण करणारा व्यक्ती कुटुंबात उपलब्ध नाही, अशा मतीमंद,सेरेबल पालसी,ऑटीझम,विशेष विकलांग, बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांची प्रथम

प्राधान्याने अटी व शर्तीच्या अधिन राहून निवड करण्यात येईल. याबाबत रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील. भविष्यात मौका चौकशी मध्ये तफावत आढळून आल्यास सदर योजनेचा लाभ बंद करण्यात येईल.

6. लाभ घेणाऱ्या अर्जदाराने नागपूर महानगरपालिकेच्या इतर योजनेंतर्गत लाभ घेतला नसल्याचे हमीपत्र रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.विभागामार्फत इतर योजनेंतर्गत लाभ घेत नसल्याची खात्री झाल्यावर दिव्यांग लाभार्थ्यांची या योजनेंतर्गत निवड करण्यात येईल.
7. सदर योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या अर्जदारांनी हयात असल्याबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये व मनपा मुख्य कार्यालयातील समाज विकास विभागास बँकेमार्फत प्रमाणित करून १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत दरवर्षी सादर करणे बंधनकारक राहील.त्याशिवाय पुढील हप्त्यांचा लाभ मिळणार नाही.
8. मध्यंतरी अर्जदार लाभार्थी याचा मृत्यू झाल्यास कुटुंबांमार्फत विभागास लेखी कळविणे आवश्यक राहील.
9. हा लाभ संबंधित लाभार्थ्याच्या ह्याती पर्यंतच मर्यादेत राहील.त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांचा वारसांना किंवा त्यांच्या पालकांना लागू राहणार नाही.
10. सदर योजनेचा लाभ फक्त ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल उर्वरीत दिव्यांगाना उक्त योजनेचा लाभ मिळणार नाही.
11. सदर निर्वाह भत्ता योजना हि फक्त 1 वर्षाकरिता अंमलात राहील, 1 वर्षानंतर सदर योजनेस मुदतवाढ देण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
12. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकारी किंवा स्वत: प्रमाणित केलेले असावेत.
13. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
14. योजनेंतर्गत अर्जदारास वयाची अट लागू राहणार नाही.

ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील एकूण ३८९२ लाभार्थ्यांस, ३८९२ X रु.५०० = रु.१९,४६,०००/- (अक्षरी - ऐकोनविस लक्ष छेचाळीस हजार) प्रतिमाह आणि वार्षिक रु.१९,४६,०००/- X १२ महिने = २,३३,५२,०००/- ( अक्षरी - दोन कोटी तेहत्तीस लक्ष बावन्न हजार रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर्हू खर्च दिव्यागांकरिता मदत या पदशीर्ष क्र. A२७३०१३४२३०२ अंतर्गत करण्यात येईल.

करिता,उपरोक्त निकषाच्या अधीन राहून योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता तसेच योजनेंतर्गत अपेक्षित रु.२,३३,५२,०००/- ( अक्षरी - दोन कोटी तेहत्तीस लक्ष बावन्न हजार रुपये) खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 64/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 07/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार १) नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१/वि.क्र.११२,दि. ०२.०३.२०२२ समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत दिव्यांग बांधवांकरिता वैयक्तिक तथा सामुहिक योजने अंतर्गत विविध योजना

राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवितांना त्यांच्या अटी व शर्ती निर्गमित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संबंधित सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. तथापि या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान त्या-त्या घटक योजनांकरिता निर्गमित करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये, निकषांमध्ये सुधारणा करणे व निर्वाह भत्त्यासारखी नवीन योजना आवश्यक असल्यामुळे नागपूर महानगरपालिका ठराव क्र.२४१ / वि.क्र.११२, दि.०२.०३.२०२२ अन्वये अटी व शर्तीमध्ये, निकषांमध्ये सुधारणा करण्यात आले असून त्यानुसार दिव्यांग योजनांची अंमलबजावणी सुरु होती. तथापि, सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान मतीमंद घटकातील दिव्यांगांना निर्वाह भत्ता योजनेंतर्गत वयाची अट ६० असल्यामुळे, ६० वर्ष पूर्ण केलेल्या दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित होते.परंतू या आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत एकही दिव्यांग व्यक्ती वयाचे अटीमुळे पात्र न झाल्याने त्यांना योजनेचा लाभ देता आला नाही.

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात नागपूर मनपा द्वारे दिव्यागांच्या सुरु असलेल्या योजनाबाबत मा.प्रशाक तथा आयुक्त यांना बैठक दि. ०८.०९.२०२३ रोजी आयोजित करून दिव्यांग विकास आराखड्यास मान्यता प्रदान केली.आराखड्यातील अनु क्र.३ अन्वये ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी यांना लाभ देणे हेतू निकषात बदल करून सुधारित निकषानुसार योजना राबविण्याचे निर्देश दिले होते.त्याअनुषंगाणे पुढीलप्रमाणे सुधारित योजना प्रस्तावित करण्यात येत आहे,

नागपूर शहरी भागात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील लाभार्थ्यांची संख्या ३८९२ आहे.संजय गांधी निराधार योजना तसेच राजमाता जिजाऊ अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेण्याकरिता विभागास अर्ज सादर केल्यावर विभागाचे अटी व शर्तीनुसार पात्र ठरल्यास त्यांना योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. या योजने करिता वयाची अट रद्द करण्यात येत आहे.निर्वाह भत्ता योजनेचे निकष पुढीलप्रमाणे आहे

योजना :- मतिमंद,सेरेबल पालसी,ऑटीझम,विशेष विकलांग,बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांगांना निर्वाह भत्ता अर्थसहाय्य योजना.

अर्थसहाय्य :- प्रति लाभार्थी दरमहा रु. ५००/-

अर्थसंकल्पीय व्यय पद क्र.व पद शिर्ष विवरण :- A२७३०१३४२३०२ - दिव्यागांकरिता मदत

**अटी व शर्ती :-**

1. कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान 3 वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/ पासपोर्ट/ रेशनकार्ड/ विवाह नोंदणी दाखलापुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)
2. आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सादर करणे बंधनकारक राहील.
3. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.
4. अर्जासोबत दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र व UDID कार्ड जोडणे बंधनकारक राहील. UDID कार्ड जोडल्याशिवाय योजनेचा लाभ देता येणार नाही.
5. सदर योजनेंतर्गत अनाथ किंवा अर्जदारांचा पालन पोषण करणारा व्यक्ती कुटुंबात उपलब्ध नाही, अशा मतीमंद,सेरेबल पालसी,ऑटीझम,विशेष विकलांग, बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थ्यांची प्रथम प्राधान्याने अटी व शर्तीच्या अधिन राहून निवड करण्यात येईल. याबाबत रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील. भविष्यात मौका चौकशी मध्ये तफावत आढळून आल्यास सदर योजनेचा लाभ बंद करण्यात येईल.
6. लाभ घेणाऱ्या अर्जदाराने नागपूर महानगरपालिकेच्या इतर योजनेंतर्गत लाभ घेतला नसल्याचे हमीपत्र रु. 100/- चे स्टॅम्प वर किंवा स्वयं घोषणापत्र लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.विभागामार्फत इतर

योजनेंतर्गत लाभ घेत नसल्याची खात्री झाल्यावर दिव्यांग लाभार्थ्यांची या योजनेंतर्गत निवड करण्यात येईल.

7. सदर योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या अर्जदारांनी हयात असल्याबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये व मनपा मुख्य कार्यालयातील समाज विकास विभागास बँकेमार्फत प्रमाणित करून १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत दरवर्षी सादर करणे बंधनकारक राहील.त्याशिवाय पुढील हप्त्यांचा लाभ मिळणार नाही.
8. मध्यंतरी अर्जदार लाभार्थी याचा मृत्यू झाल्यास कुटुंबांमार्फत विभागास लेखी कळविणे आवश्यक राहील.
9. हा लाभ संबंधित लाभार्थ्याच्या ह्याती पर्यंतच मर्यादेत राहील.त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांचा वारसांना किंवा त्यांच्या पालकांना लागू राहणार नाही.
10. सदर योजनेचा लाभ फक्त ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल उर्वरीत दिव्यांगाना उक्त योजनेचा लाभ मिळणार नाही.
11. सदर निर्वाह भत्ता योजना हि फक्त 1 वर्षाकरिता अंमलात राहील, 1 वर्षानंतर सदर योजनेस मुदतवाढ देण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.
12. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिकारी किंवा स्वत: प्रमाणित केलेले असावेत.
13. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजूर करणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
14. योजनेंतर्गत अर्जदारास वयाची अट लागू राहणार नाही.

ऑटीझम,सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक दिव्यांग, बहुदिव्यांग प्रवर्गातील एकूण ३८९२ लाभार्थ्यांस, ३८९२ X रु.५०० = रु.१९,४६,०००/- (अक्षरी - ऐकोनविस लक्ष छेचाळीस हजार) प्रतिमाह आणि वार्षिक रु.१९,४६,०००/- X १२ महिने = २,३३,५२,०००/- ( अक्षरी - दोन कोटी तेहत्तीस लक्ष बावन्न हजार रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. सदहू खर्च दिव्यागांकरिता मदत या पदशीर्ष क्र. A२७३०१३४२३०२ अंतर्गत करण्यात येईल.

करिता,उपरोक्त निकषाच्या अधीन राहून योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता तसेच योजनेंतर्गत अपेक्षित रु.२,३३,५२,०००/- (अक्षरी - दोन कोटी तेहत्तीस लक्ष बावन्न हजार रुपये) खर्चाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**